निविदा नोटीस

मा.जिल्हा न्यायालय, सातारा, यांनी निर्देशित केलेप्रमाणे या न्यायालयातील फाडणी झालेल्या कागदांचे रद्दीची विक्री करणेकरीता रद्दी खरेदी करणार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत. निविदेमध्ये खाली नमूद बाबींचा उल्लेख नमूद करावा.

अ) निविदा सिलबंद लखोटयामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड यांचे नावे जमा करणेत यावी. तसेच त्यावर ''निविदा- रद्दी कागदांची विक्री'' असा उल्लेख करावा.

ब) निविदेमध्ये रद्दीचे दरांचा स्पष्ट उल्लेख नमूद करावा.

क) फाडणी झालेली रद्दी जशी आहे, त्या स्वरुपात खरेदी करावी लागेल.

ड) रद्दीचे वजन जागेवर समक्ष करावयाचे आहे. तसेच ज्या खरेदीदार यांची निविदा मंजूर होईल, त्यांनी स्वखर्चाने वजन काटा घेवून येवून समक्ष वजन करुन रद्दी विकत घ्यावयाची आहे.

इ) रद्दीच्या खरेदीची रक्कम न्यायालयात तात्काळ जमा करावी लागेल.

सदर निविदा दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक ०२ मार्च, २०२६ पर्यंत मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड, दिवाणी न्यायालय व. स्तर, कराड यांचे नावे सिलबंद लखोटयात समक्ष येऊन दयाव्यात. त्यावर रद्दी खरेदीकरणार यांनी त्यांचे पूर्ण नांव, पत्ता, ई. मेल आयडी, दुरध्वनी अथवा मोबाईल नमूद करावा.

सदर निविदा ही दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजी उघडण्यात येतील. निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याचे सर्व अधिकार मा. जिल्हा न्यायालय, सातारा, यांना राहतील.

दिनांक:- ११ फेब्रुवारी, २०२६
स्थळ:- कराड.

12/02/26.
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड
दिवाणी न्यायालय व. स्तर, कराड

प्रत:-

१. मा.अधिक्षक, अति. जिल्हा न्यायालय, कराड यांचे न्यायालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकामी.
२. मा.सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, कराड यांचे न्यायालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकामी.
३. तहसिलदार कार्यालय, कराड, पंचयायत समिती कार्यालय व नगरपरिषद, कराड यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकामी.
४. मा. जिल्हा न्यायालय, सातारा संगणक विभाग(संकेत स्थळावर प्रसिध्द करणेसाठी)
५. कराड बार असोसिएशन, नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकामी.

CIVIL JUDGE SENIOR DIVISION
सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन
सत्यमेव जयते
कराड
KARAD